MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

Jan. To March 2018
Issue-22, Vol-17

Date of Publication
15 March 2018

Editor
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors www.vidyawarta.com

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

157

14) A comparative study of sell confidence of teachers
Dr Deepti Gaur || 62

15) मानव जीवनात संगीताचा प्रवास
डॉ. सुनिल पारीसे || 65

16) 1980 नंतरच्या स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या स्त्री कथा
श्रीमती बोबडे वैशाली अरूणराव, डॉ. राजशेखर नळगे, || 67

17) जोतीराव फुलेंचा राजकीय दृष्टीकोन
प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी || 70

18) तंटामुक्त समिती एक न्यायालय
कांबळे शरद पुंडलिक || 72

19) दशावतार : लोकसाहित्याचा उत्स्फूर्त आविष्कार
डॉ. प्रवीण बनसोड || 74

20) संस्कृत नाटककार भासाचे 'अविमारकम्' आणि वर्तमान युवावर्ग
मृदुला विजय काळे || 76

21) मौलिक अधिकार और भारतीय संविधान
विजय वडजराव || 81

22) ''केन्द्रीय भण्डारण निगम का इतिहास एवं वर्तमान स्थिति का अध्ययन''
डॉ. रणधीर कुमार श्रीवास्तव || 83

23) प्रधानमंत्री के रूप में डॉ. मनमोहन सिंह – एक विश्लेषण
श्रीमती श्वेता मोर, डॉ.सुभाष चंद्राकर || 86

24) नोटबंदी के रोजगार पर प्रभाव
प्रा. डॉ. रविंद्र मोहतुरे || 90

25) हिन्दू मुस्लिम महिलाओं की धार्मिक स्थिति का तुलनात्मक अध्ययन
कु. सरिता, डॉ. रेनू प्रकाश || 93

26) अमृतलाल नागर के उपन्यासों का भाषिक अधिग्रहण
डॉ. राकेश कुमार || 96

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

16

# १९८० नंतरच्या स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या स्त्री कथा

संशोधन विद्यार्थीनी
श्रीमती बोवडे वेशाली अरूणराव

मार्गदर्शक
डॉ. राजशेखर नळगे,
सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग) जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर ता. तुळजापूर जि. उ.बाद

***********

घोषवारा:-

१९७५ नंतर महाराष्ट्रात स्त्रीवादी चळवळी सुरू झाल्या असे मानले जाते. कोणतीही नविन विचार सरणी जेव्हा समाजात रुजत असते तेव्हा समाज बदलायला एक दिशा मिळत असते. त्यामुळे स्त्रीवादाचा अभ्यास करताना मुळातच स्त्रीवाद ही संकल्पना काय आहे. याचा कथा लेखनावर काय परिणाम झाला याचा अभ्यास '१९८० नंतरच्या स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या स्त्री कथा' या शोधनिबंधात करणार आहे.

स्त्रीवादी भूमिकेवर आधारित प्रमुख स्त्रीकथा, त्यातील व्यक्तिरेखा, स्त्रीला झालेली 'स्व' ची ओळख, स्वालंबी, स्वाभीमानी जीवन जगणाऱ्या तसेच आत्मभान व आत्मसन्मानाची जाणीव याचा अभ्यास मराठी स्त्रीकथा द्वारे या शोधनिबंधात करणार आहे.

महत्वाचे शब्द

स्त्रीवाद, स्त्रीकथा, स्त्रीप्रतिमा, आत्मभान, आत्मसन्मान, स्त्रीमुक्ती

**प्रास्ताविक:-**

'साहित्य हा समाजाचा आरसा आहे.' असे म्हटले जाते. जे समाजात घडते त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. अशा प्रकारे साहित्य आणि समाज याचा अत्यंत जवळचा सबंध आहे. १९७५ च्या दशकात महाराष्ट्रात स्त्रीवादी विचार सरणी पुढे आली. स्त्रीला माणूस म्हणून नकार देणाऱ्या पशुतुल्य वागणूक देणाऱ्या व्यवस्थेविरूध्द लढा देत स्त्रीला स्वतःचे स्थान प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीवाद ही विचारप्रणाली आली.

शिक्षणाच्या माध्यमातून स्त्री नोकरी करू लागली पण संसार सुखासाठी मोठ्या पगाराच्या नोकऱ्या सोडतानाही ती दिसायची पुढे मात्र स्वाभिमानी, आत्मगौरव, आत्मविश्वास, स्वातंत्र, स्वालंबन यातून समाजाच्या जडणघडणीत एक जबाबदार घटक म्हणून सामील होणे या जाणीवेतून स्त्रीवादाकडे हा प्रवास सुरू झाला. याची पडसात लेखीकांच्या कथा विश्वात उमटले का? याचा अभ्यास करताना लक्षात आले की, बऱ्याच लेखीकांच्या कथा स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या आहेत. विषयाला योग्य न्याय देण्यासाठी १९८० नंतर लिहिलेल्या लेखिकांच्या कथांचाच फक्त या लेखात परामर्श घेतला आहे.

**शोध निबंधाचा उद्देश :-**

१) स्त्रीवादी संकल्पना समजून घेणे.

२) स्त्रीवादाचा मराठी लेखिकांनी लिहिलेल्या कथांनवरील अनुकूल प्रतिकूल परिणामांचा शोध घेणे.

३) मानवतावादी मूल्यांचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा उपयोग केलेला आहे. यामध्ये अभ्यास विषयाला धरून वेगवेगळे कथा संग्रह, संदर्भ ग्रंथ, मासिके इ. दुय्यम साधनांचा उपयोग केलेला आहे

**स्त्रीवादाची संकल्पना:-**

स्त्रीवादाच्या संदर्भात स्त्रीमुक्ती, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीवाद या पारिभाषिक संकल्पना रूढ आहेत. पुरूष प्रधान समाज व्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान दिल्याने धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, बौध्दिक, भाषिक अशा सर्व व्यवस्था स्त्रीयांचे शोषण करतात. याची जाणीव झाल्याने त्या व्यवस्थे विरूध्द बंड करण्याच्या उद्देशाने स्त्रीमुक्तीच्या चळवळी अस्तित्वात आल्या.

स्त्रीकडे माणूस म्हणून पाहताना स्वत्वाची जाणीव तसेच तिच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊन स्वतःच्या अस्मितेसाठी संघर्ष करणे याला स्त्रीवाद असे म्हणतात. डॉ. आश्विनी धोंगडे यांच्यामते, "स्त्रीवाद म्हणजे पुरूषा पासुन फारकत घेवून स्वतःचा सवता सुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली. त्यातुन बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यसपीठ आहे. ज्यावेळी स्त्रीही खुलेपणाने श्वास घेऊन पुरूषांइतके स्वतंत्र जीवन जगू शकते त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही." १ डॉ. आश्विनी धोंगडे यांच्या म्हणण्यानुसार स्त्रीचे माणुन म्हणुन जगणे महत्वाचे वाटते.



160

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

**स्त्री प्रतिमा:-**

पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्री ही नाजुक, सोशिक, दयाशील, सात्विक, भावनावश, भित्री, पराभूत, प्रेमळ, माघार घेणारी, उपभोग्य वस्तू अशा प्रतिमा समाज मनावर बिंबवल्या आहेत.

पुर्वीची स्त्री ही आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या परावलंबी असल्यामुळे पुरूषांकडून होणार सर्व अन्याय मुकाटपणे सहन करीत होती. सिमॉन - द-वोव्हा या पाश्चात्य स्त्रीवादी विचावंत स्त्रीने म्हटलेले आहे की, "बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही, तिला बाई बनविले जाते. समाज स्त्रीची घडण बाई म्हणून करत असतो." २

**स्त्रीवादाची भूमिका:-**

स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती म्हणजे पुरूषा पासून मूक्ती नव्हे तर जशी वागणुक पुरूषाला मिळते तशीच वागणूक स्त्रीलाही मिळावी कारण ती ही एक माणूसच आहे. अशा प्रकारे स्त्रीवादाला स्त्री- पुरूष समानता हवी आहे.

**स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या कथा:-**

तसे पाहिले तर स्त्रीयांनी लिहिलेले सर्वच साहित्य स्त्रीवादी नाही हे जरी खरे असले तरी तिच्या अनुभवातून लिहिलेल्या साहित्यकृतीतून पुरूषसत्ताक राजकारण उघड होऊ शकेल. १९४८ साली महात्मा फुले यांनी पुणाच्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली तर शिक्षणाच्या पुरस्कर्त्या सावित्रीबाई फुले यांनी 'शिक्षणाने बाईले मनुष्यत्व येते आणि पशुत्व हाटते.' ही स्त्री मुक्तीची संकल्पना मांडली. १९८२ ला ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरूष तुलना' हा स्त्री पुरूष समानतेची मागणी करणारा ग्रंथ लिहिला तर १९३३ मध्ये विभावरी शिरूरकर यांनी 'कळ्यांचे नि:श्वास' हा ग्रंथ लिहून स्त्रीच्या अस्तिवात्त्वाची जाणीव समाजाला करून दिली. १९८० नंतर स्त्री साहित्यात्त झालेला बदल हा स्वागताहं आहे.

**पुरूषप्रध्यानतेस विरोध करणाज्या कथा:-**

१९८० नंतरच्या लेखिकेंच्या कथेतील स्त्रीव्यक्तीरेखा या पुरूषप्रध्यानतेस विरोध करणाज्या आहेत. शिक्षणातून आलेली समज यातून आधुनकतेचा स्वीकार करून जुनी पारंपारिक विचारांची चाकोरी मोडण्याचा प्रयत्न त्या करताना दिसतात. योगिनी वेंगुर्लेकर यांच्या 'कवडसे' या कथासंग्रहातील 'लटके न बोलिजे' या कथेतील दीप्ती ही नायिका एक हुशार, अभ्यासू व भरपूर पैसे कमविणारी मुलगी पण दिसायला साधारण असल्यामुळे लग्न जमण्यात अडचणी येतात. या पुरूष प्राधान संस्कृतीत स्त्री कितीही शिकली, कमावती असती तरी तिने स्वयपाकही चांगला करावा या समाजाच्या अपेक्षेवर ती तडप म्हणते. "मी स्वयपाकात रमणारी बाई नाही याची ठणठणीत कल्पना या मंडळीना दिली तर बिघडलं कुठे?"३ अशा प्रकारे पुरूषप्रधानतेला विरोध करणारी दीप्ती ही स्त्रीला केवळ मादी समजणाज्या जतीन च्या स्थळाला स्पष्ट नकार देते.

साधारणपणे पारंपारिक प्रतिमा नाकारून स्त्री मनाचा वेध घेणार साहित्य म्हणजे, स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल. "नीरजा यांनीही काही स्त्रीवादी आशयसूत्रांचे प्रभावी दर्शन आपल्या कथासंग्रहातून घडविले."४ नीरजा यांनी स्त्रीपुरूष नात्यांचा वेध सुक्ष्मपणे कथांतून घेतला आहे. नीरजा यांच्या 'जवळचे तरी दूर' या कथेतील या कथेतील माई ही स्त्रीचे पारंपारीक जगणे मांडते तर त्यावर आधुनिक विचारांची मधु म्हणते. "वेण्या गजज्यासाठी आणि दागदागिण्यांसाठी ऐवढं सोसणं माई. मी तर कल्पनाच करू शकत नाही." ५ आजची स्त्री ही पुरूष प्रधान संस्कृतीतील पारंपारीक चौकटीत जीवन जगू शकत नाही. नीरजा यांच्या नायिका या संसारामध्ये जीवनाच्या सार्थक माननाज्या नाहीत तर कोणी निर्णय लादण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्याशी वैचारिक वाद घालून आहे हे असे आहे असे सांगणाज्या अशाच आहेत.

नीलिमा बोरवणकर यांच्या 'क्षणांत कळले मजला' या कथेची नायिका प्रतिभा मानपाणासाठी नवज्याकडून सतत होणाज्या मागण्यांना कंटाळून त्याचा पासुन घटस्फोट घेते. स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभे राहण्याचा प्रयत्न करते व पुढे तिला समजून घेणाज्या मुलाबरोबर पुर्नविवाह करते.

**स्वालंबी व स्वाभिमानी जीवन जगणाज्या स्त्रीकथा:-**

आधुनिक काळात स्वालंबी व स्वाभिमानी जीवन जगणाज्या कथानायिकांचा समावेश स्त्रीवादात होतो. "लग्नानंतर स्वत्व जोपासण्याची, जपण्याची स्त्रीची उत्कट इच्छा, स्त्रीला निर्णय प्रक्रियेत सहभाग असावा म्हणून करावा लागणारा संघर्ष, पुरूषकेंद्री समाजात स्वत:चे स्थान निर्माण करण्याची जिद्द या दशकातील मधुसावंत, निता गद्रे, नीलम माणगांवे, योगिनी वेंगुर्लेकर इ. लेखिकांच्या कथांतून प्रकटली आहे यांच्या कथा नायिका स्व - कर्तृत्वार आर्किटेक्ट, जाहिरात, मार्केटिंग, व्यवस्थापन, राजकारण इ. पुरूषांच्या म्हणून मानल्या गेलेल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या दिसतात... एकुणच समाज व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर स्वत:कडे स्वत:च्या अपेक्षाकडे विश्लेषक दृष्टिने पाहता येणे ही स्त्रीवादी जाणीवेची निदर्शक बाब आहे."६

योगिनी वेंगुर्लेकर यांच्या 'कवडसे' या कथासंग्रहातील 'लटके न बोलिजे' या कथेतील दीप्ती ही नायिका चार्टर्ड अकाऊंटंट असून फाईनन्शियल कन्सलटंट म्हणून स्वत:च्या पायावर उभी आहे. सतत कॉम्प्युटरवर अभ्यास करून पुरूषी समजले जाणाज्या शेअर मार्केटची संपूर्ण माहिती घेऊन तंतोतंत भाकीत करणारी दीप्ती ही कथा नायिका स्वाभीमानी जीवन जगताना दिसते.

माधुरी शानभाग यांच्या 'समुद्र' या कथासंग्रहातील ' माती



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

'आपण जाती' या कथेतील कांचन ही नायिका पतीच्या निधनानंतर शिक्षण पूर्ण करून प्राध्यापक म्हणून नोकरी करते. हॉटेल हा व्यवसाय पुरूषांचा मान समजला जातो. पतीच्या निधनानंतर पतीचा हॉटेलचा व्यवसाय खंबीरपणे सांभाळून स्वालंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करते. व कुटूंबाची जबाबदारी ही खंबीरपणे पेलते.

**आत्मभान व आत्मसन्मानाची जपणूक करणाऱ्या कथा:-**

स्त्री शिक्षणामुळे स्त्रीला आत्मभान व आत्मसन्मानाची जाणीव झाली हे १९८० नंतरच्या लेखिकांच्या कथांमधून पाहिला मिळते. आत्मभान जागृतीमुळे आजची आधुनिक स्त्रीही सामाजिक प्रश्नांवर ही अभ्यास करून परखडपणे स्वत:चे विचार समाजापुढे मांडताना दिसते. माधुरी शानभाग यांच्या 'पुर्नवसन' या कथासंग्रहातील 'होते कुरूप वेडे' या कथेतील मानसीही स्वत: एक पत्रकार असून देवदासीच्या प्रश्नांवर अभ्यास करून एकाच सेमिनार स्वत:चे विचार परखडपणे मांडून स्त्रीच्या आत्मसन्मानाची जाणीव समाजाला करून देते.

मधू सावंत यांच्या 'तिची वाटच वेगळी' ''या कथासंग्रहातील जवळ जवळ सर्वच कथा या स्त्रीलक्षी आहेत... बदलत्या राजकीय संदर्भाने ग्रामिण स्त्रीचं आत्मभान हळूहळू जागं होत आहे. या आत्मभानाची ओळख करून देण्याचा मी अल्पसा प्रयत्न केला आहे.'' ७ मधु सावंत यांच्या 'तिची वाटच वेगळी' या कथेतील या कथेतील चंद्रकला ही नाईका मराठीतल्या अनुताई वाघ यांच्या धड्यातून आत्मभान घेवून त्यांच्या प्रमाणे स्त्रीशिक्षीत करून स्वालंबी बनविण्यासाठी सरपंच पदाची निवडणूक लढविते. पतीच्या विरोधाला व दबावाला न जुमानता स्वत:च्या हक्कासाठी लढते अशी बंडखोर नायिका लेखिकेने कथेतून घडविले आहे.

मृणालिनी चितळे यांच्या 'सिनार' या कथासंग्रहातील ' भुमिका' या कथेतील शलाका ही घरचा विरोध पत्करून आवडणाऱ्या मुलाबरोबर लग्न करून फॅशन टेक्नोलॉजीचा कोर्स पूर्ण करते. स्वत: चे निर्णय स्वत: घेणे हे आजच्या आधुनिक स्त्रीचे लक्षणच आहे. दोन मुली घर संसार सांभाळत आत्मसन्मानाची जपवणूक करणारी शलाकी ही स्त्री व्यक्ती रेखा स्त्रीवादी चळवळीचा परिणामच म्हणावा लागेल.

**निष्कर्ष:-**

१) १९८० नंतर च्या कथालेखिकाचे अनुभवविश्व पूर्वीच्या लेखिकांच्या मानाने विस्तारीत झालेले आहे.

२) स्त्री साहित्यातील सर्वच अनुभव स्त्रीवादी नसले तरी स्त्रीनिष्ठ आहे.

३) पुरूषसत्ताक व्यवस्थेविरूध्द संघर्ष, माणूसपणाची प्रखर जाणीव, स्वालंबी व स्वाभीमानी जीवन जगणारी स्त्री स्वअस्तित्व तसेच स्वतंत्र विचाराच्या नायिका लेखिकांनी कथेतून घडविलेल्या आहेत.

४) १९८० नंतरच्या कथा लेखिका आधुनिक [illegible] संवाद वापरताना दिसतात. यातून लेखिकांची प्रयोगशीलता लक्षात येते

५) १९८० नंतरच्या लेखिका [illegible] विचार करताना दिसतात.

**समारोप:-**

आजची स्त्री मोठ्या प्रमाणात कथा लेखन करताना दिसते. १९८० नंतर लिहणाऱ्या वरील लेखिकांचे अनुभव विश्व पूर्वीच्या लेखिकांच्या मानाने विस्तारीत झालेले दिसते. तरी आजूनही म्हणावी तितकी व्यापकता कथा साहित्यात आली. असे म्हणता येणार नाही स्त्रीवादाला अपेक्षित असणारी मूल्य स्त्री साहित्यात येणे आवश्यक आहे. स्त्रीवादी लेखन करणाऱ्या काही लेखिका सोडल्यातर इतर लेखिका मात्र त्यांच्या कथेतून स्त्रीमनाचा खोलात विचार करताना दिसतात. स्त्रीवादी साहित्य म्हणजे स्त्रीवादाच्या प्रभावातून निर्माण झालेले साहित्य असे साधारणपणे म्हणता येईल. पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीच्या अनुभवांना अनेकदा दाबून ठेवले आहे. म्हणून स्त्रियांच्या साहित्यातून व्यक्त झालेले अनुभव त्यांच्या जाणीव जागृतीमुळे स्त्रीवादी अनुभव समजता येतील.

**संदर्भ सूची**

१) डॉ. आश्विनी धोंगडे : 'स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन' , दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती मार्च-१९९३ पृ -६

२) डॉ. वंदना महाजन : 'स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन', अथर्व पब्लिकेशन्स, जळगांव, प्रथमावृत्ती, २०१३, पृ-४०

३) योगिनी वेंगुर्लेकर : 'कवडसे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती सप्टें. २००५, पृ.१८.

४) डॉ. मंदा खाडंगे(संपा.) : 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड-४'(इ.स. २००१ ते २०१०) साहित्य प्रेमी भगिनी मंडळ पुणे यांचा प्रकल्प, प्रथमावृत्ती नोव्हे. २०१५, पृ.२२

५) नीरजा : 'जे दर्पणी बिंबले' मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे, प्रथमावृत्ती डिसे.२००१, पृ.१५

६) डॉ. मंदा खांडगे(संपा.) : उ.नि. पृ-२१

७) मधु सावंत : 'तिची वाटच वेगळी', रजत प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती (मनोगत)

□□□



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.